"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३
WEB SITE : http://www.nkgsbsangh.org
E-MAIL : nkgsbs@gmail.com
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। स्तोत्रं कस्य न तुष्टये।।



मूल्य रु. ५

| | | |
|---|---|---|
| क्रमांक ४ | वर्ष : ३८ | जानेवारी-मार्च २०१७ |

**BOOK PACKET (PERIODICAL)**
Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

##  मुंबई मंच – कारवारी मेळाव्याचे आमंत्रण 

**'कारवारी खाद्यमेळाव्याला'** दरवर्षी मिळणाऱ्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे स्फूर्ती घेऊन यंदाही एक 'आनंद मेळावा' भरविण्यात येत आहे. पाककृतीशिवाय ज्यांना आपण बनविलेल्या वस्तू किंवा पदार्थ विक्रीसाठी किंवा प्रदर्शनासाठी ठेवायचे असतील, व ज्यांना बालगोपाळासाठी करमणुकीचे खेळ आयोजित करावयाचे असतील त्यांनाही गाळा मिळेल. इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.

**तारीख व समय** : रविवार २२ जानेवारी २०१७ संध्याकाळी ५.०० ते ९.००
**कार्यस्थळ** : सरस्वती बाग, जोगेश्वरी, के.जी एस. सोसायटी पटांगण
**आकार** : रु. ८०० एका गाळयासाठी
**संपर्क** : गाळा आरक्षणासाठी व पाककृती ठरविण्यासाठी. **(रात्री ७ ते १०)**

**रसिका गायतोंडे : ९९६७४३४४०१ राजू बोरकर : ९८२०९१७८४१**

**संपर्कासाठी अंतिम तारीख : १५ जानेवारी २०१७.**

प्रथम नोंदणी करणाऱ्यास प्राधान्य
किस्मूर, एरप्पे, सुकरुंडे, हीट, पातोळी इत्यादींवर ताव मारण्यासाठी
सर्वांनी मोठया संख्येने हजर राहावे.


ॐ

## SAI LUNCH HOME AND CAFÉ,KARWAR

## कारवारकर खवय्यांना खुशखबर

आपल्या ज्ञातिबांधवांचे आतां काळी ते गंगावळीच्या परिसरांतून मुंबई ते अमेरिकापर्यंत जवळजवळ संपूर्ण स्थलांतर झाले आहे. पण ते माजाळी ते होन्नेकेरी पर्यंतच्या आपल्या मूळ गांवाला वा तिकडच्या माशांच्या विविध प्रकारांना विसरले नाहीत. कुठलेही दोन कारवारकर अंधेरी किंवा सिटी लाईटच्या फिश मार्केटमध्ये भेटले तर त्यांचा एकमेकांना पहिला प्रश्न असतो, 'आज किते मेळ्ळे.' ते गोव्याला गेले तर एक वेळ मंगेशीची सोमवारची पालखी चुकवतील पण कारवारला गेल्यावेळी रविवारचा 'साते बाजार' चुकवणार नाहीत. ही मंडळी जेव्हां कारवारला जातात तेव्हां 'भूस' कुठे मारायचा असा प्रश्न पडतो. आता ही समस्या दूर झाली आहे. तेथे मेन रोडवर बोरकरांच्या हॉटेल साई इंटरनॅशनलच्या लगत 'मांगिरीश प्लाझा' येथे जिभेचे चोचले पुरविणारे अस्सल कारवारी पध्दतीचे खाद्यपदार्थ मिळण्याची सोय झाली आहे.

तेव्हा कारवारला गेल्यावेळी किस्मूर, धबधबे, धोडक, घालणीची भाजी, तिसरेमासाचे वडे यावर ताव मारण्यासाठी भेट द्या.

**मांगिरीश प्लाझा, हॉटेल साई इंटरनॅशनलजवळ, मेन रोड**

## हळदीकुंकू समारंभ - भगिनींस आमंत्रण

नेहमीचा मकरसंक्रांतीचा हळदीकुंकू समारंभ यंदा माहीम व ठाणे येथे योजिला आहे. आपण हेच निमंत्रण समजून वेळांत वेळ काढून आपल्या लेकीसुनांसह सोयीस्कर ठिकाणी अवश्य यावे ही विनंती

| | माहीम | ठाणे |
|---|---|---|
| **तारीख** | शनिवार १४ जानेवारी २०१७ | शुक्रवार २० जानेवारी २०१७ |
| **कार्यस्थळ** | माटुंगा मित्रमंडळ<br>एफ ४, कर्नाटक बिल्डिंग,<br>मोगल लेन, माहीम. | सौ. उमा विजय वागळे यांच्या निवासस्थानी<br>२०१ गिरी दर्शन, श्री पेट्रोल पंप,<br>सावरकर मार्ग, ठाणे (प) |
| **वेळ** | संध्याकाळी ५ ते ७ | संध्याकाळी ४.३० ते ७.३० |
| | **संघ कार्यकारिणीतर्फे**<br>किशोरी अ. वागळे<br>नीलिमा श. नाडकर्णी | **सांस्कृतिक मंचतर्फे**<br>उमा वि. वागळे ९८६९४०९०५६<br>मंजिरी कुलकर्णी |

# संपादकीय

### श्री शांतादुर्गा सार्ध चतुःशताब्दी महोत्सव उत्साहात संपन्न

कवळे येथील श्रीशांतादुर्गेची मूर्ती काही शतकापूर्वी साष्टी तालुक्यातील केळोशी या गांवी होती. ती मूर्ती सध्याच्या कवळें ग्रामांत स्थानापन्न होऊन मार्गशीर्ष शु ५मी रोजी म्हणजे ४ डिसेंबरला साडेचारशे वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्त २५ नोव्हेंबर ते ४ डिसेंबरपर्यंत एक फार मोठा सोहळा मोठया उत्साहांत साजरा करण्यांत आला. या सोहळया अंतर्गत बहुशः महाराष्ट्र, गोवा व किनारी कर्नाटक मधून सुमारे ५३० वैदिकी उपस्थित होते. त्यांच्यातर्फे अयुतचंडी, अतिरुद्र स्वाहाकार, पंचायतन याग, चतुर्वेद स्वाहाकार, श्री. देवी भागवत पारायण असे अनेक वैशिष्टयपूर्ण धार्मिक विधी साकार झाले. प्रत्येक दिवशी सरासरी चार ते पाच हजार भक्तांसाठी अन्नसंर्तपण करण्यात येत असे. पंचमीच्या सांगता समारंभाच्या दिवशी तर उपस्थिती दहा हजारांची होती. दोन डिसेंबर रोजी कैवल्यपूर, गोकर्ण-पर्तगाळ व चित्रापूर पीठांचे स्वामीजी यांना निमंत्रण करण्यांत आले होते. देवस्थानाच्या पदाधिकाऱ्यांमार्फत त्यांची पाद्यपूजा करण्यांत आली. संध्याकाळी धर्मसभा भरविण्यात आली व त्यांच्या आशीर्वचनाचा लाभ भाविकांनी घेतला.

याच सोहळयाचा उर्वरित भाग देवस्थानच्या वार्षिक उत्सवाच्या दिवशी म्हणजे माघ पंचमी (वसंत पंचमी) या दिवशी संपन्न होणार आहे. त्यावेळी देवीला सुवर्णकवच अर्पण करण्यांत येईल व स्मरणिका प्रकाशित होईल.

**नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!**

**१.१.२०१७** द.ना.नाडकर्णी

# श्री मंगेशाची आरती

श्री मंगेश माहात्म्य

जयदेव जयदेव जय जय मंगेशा।
सुखदात्या कुलदेवा जय मांगिरीशा।। धृ।।
प्रेमळ लोमेशशर्मा भक्तांचा त्राता।
सन्मुख श्रीपुरुषोत्तमा बहुभाग्यदाता।।
सान्निध्यी शिवशर्मा संसारी नेता।
स्वकुलास्तव गोमांतकि वससी भवनाथा।।१।।
शांतादुर्गा पाळी पोषी भक्तांना।
महालक्ष्मी मातेपरि सांभाळी त्यांना।।
सदया महालसाही रक्षी सकलांना।
दिव्य अशा शक्ती या प्रकटल्या नाना।।२।।
वैराग्या आनंदा ठाव तुझ्या ठायी।
निवृत्तिप्रवृत्ति लोळति तव पायीं।
रुद्रस्वरूप शिवमय शंकर सुखदायी।
प्रगटुनियां भक्तांते पावसि लवलाही।।३।।
मुलकेश्वर संकष्टीं धांवत ये वेगें।
साह्य करी भक्तां जे पिडिले भवरोगें।।
भक्तांस्तव रात्रंदिन प्रेमभरें जागे।
नित्य करी संरक्षण राहुनियां मागे।।४।।
जयजय महालसे श्रीमहालक्ष्मी माते।
जय पुरुषा शिवशर्मा जय देवी शांते।।
जय जय लोमशशर्मा जय दे आम्हांते।
मुलकेश्वर मंगेशा रक्षीं बाळां तें।।५।।
सारस्वत कुलवर्धक संरक्षक देवा।
बाळावरि करुणाघन प्रेमे वर्षावा।।
प्रपंच परमार्थाचा लाभ तया व्हावा।
अर्पी वामन पायी निष्काम सेवा।।६।।

बहुतेक आरतीसंग्रहामध्यें गणपती, शंकर, श्रीदेवी, दत्तात्रय, मारुती, विठ्ठल, श्रीकृष्ण इत्यादी देवदेवतांच्या आरत्या जास्त प्रचलित आहेत. आपल्या बहुतेकांचा कुलदेव म्हणजे श्रीमंगेश पण श्रीमंगेशाची आरती प्रचलितांमध्ये नाही. ही उणीव येत्या माघ पौर्णिमेच्या औचित्याने भरुन काढण्याचा हा प्रयत्न. ही आरती प्रकांड पंडित श्री. वामन मंगेश दुभाषी ऊर्फ ऋग्वेदी यांनी रचली होती. ती कोणत्या संग्रहात प्रसिध्द झालेली याची माहिती नाही. ही आरती त्यांचे पणतू पारल्याचे श्री. वामन (किरण) भालचंद्र दुभाषी यांनी उपलब्ध करुन दिली.

## प्रकाशझोत

**'दीपकळ्या' : सौ. मीरा प्रभूवेर्लेकर यांच्या दुसऱ्या ललितलेख संग्रहाचे प्रकाशन**

कारवार येथील गेल्या पिढीतील एक प्रतिष्ठित व्यक्ती रा. ब. गणपतराव तेलंग यांची नात व तेथील न्यूजपेपर विक्रेते कै शंकर तेलंग यांची कन्या सौ. मीरा प्रभूवेर्लेकर यांचे वास्तव्य म्हापसा येथे असते. त्या गोव्यांतील नामवंत लेखिका असून त्यांच्या लघुकथा, ललित लेख इत्यादी साहित्य निरनिराळया नियतकालिकांतून प्रसिध्द होत असते. 'असुनी नात मी' या त्यांच्या निबंधाला २००९ साली गोमन्त विद्या निकेतनचा साहित्य पुरस्कार मिळाला होता. जुलै २०१२ मध्ये 'रंग उगवतीचे' या त्यांच्या लेखसंग्रहाचे प्रकाशन झाले होते.

अलीकडेच २ डिसेंबर रोजी त्यांच्या 'दीपकळ्या' या दुसऱ्या लेखसंग्रहाचे गोवा मराठी अकादमी तर्फे पणजी येथे संस्थेचे अध्यक्ष प्रा. अनिल सामंत यांच्या हस्ते एका खास सोहळयात प्रकाशन झाले. या सोहळ्याला गोमंतकांतील नामवंत साहित्यीक आवर्जून उपस्थित होते. 'रंग उगवतीचे' लेखसंग्रहाला सुप्रसिध्द साहित्यीक डॉ. सुभाष भेण्डे यांची प्रस्तावना लाभली होती. तर 'दीपकळ्या' या संग्रहाला कै. मंगेश पाडगांवकर यांची प्रस्तावना लाभलेली आहे. त्यांच्याच शब्दांत सांगायचे म्हणजे 'मीरा प्रभूवेर्लेकर यांच्या लेखनांतून जाणवणारे मन जीवनाविषयी उत्कट कुतूहल बाळगणारे आहे. जीवनाचा अर्थ शोधणारे त्यांचे लेख यामुळेच पुन्हा पुन्हा वाचावेसे वाटतात. त्यांचे लेखन आत्मचिंतनाला हळुवार स्पर्श करते. त्यांच्या चिंतनाच्या आणि जीवनाच्या शोधाच्या आनंदयात्रेत रसिक वाचक आनंदाने सामील होतील असा मला विश्वास वाटतो. कारण हा विश्वास माझ्या स्वत:च्या अनुभवातून जन्मला आहे.'

('दीपकळ्या', मीरा प्रभूवेर्लेकर, म्हापसा ९४२०२४२३१६ पृ. १६०, मूल्य रु. १२५)

**आर्किटेक्ट दीपक तेलंग यांचे दुबईतील अनेक प्रकल्पांमध्ये उल्लेखनीय योगदान**

३० ऑगस्ट २०१६ रोजी दुबईमध्ये विश्वातील सर्वात मोठया INDOOR THEME PARK चे उद्‌घाटन झाले. त्याचे नाव आहे, IMG WORLD ADVENTURE. १५ लाख चौ. फुट क्षेत्रफळाच्या जमीनीवर बांधलेल्या भव्य इमारतीमध्ये अनेक नावीन्यपूर्ण ACTIVITIES चा समावेश आहे. The Park चे ५ प्रमुख विभाग आहेत

1. Lost Valley
2. Marvel
3. Cartoon Network
4. Entertainment Zone
5. Novo Cinemas

प्रत्येक विभाग त्या त्या विषयावर आधारीत आहेत. खास करुन Lost Valley विभागातील Dinosours आणि त्यांच्या भोवतालच्या निसर्गरम्य परीसर प्रेक्षणीय आहे. ह्याच विभागातील ३ महत्वाच्या 1) Forbidden Territory 2) Velociraptor Roller Coaster 3) Predator Ride हया Rides अंगावर शहारे आणतात तर Cartoon Network मधील Adventur time व

Ride of Gumball सारखे Shows मन प्रफुल्लीत करतात. Marvel Zone मधील Ironman / Spiderman व Hulk सारखे दोस्त आपल्या मुलांशीच नाही तर आपल्या बरोबरही दोस्ती करतात. हे ही कमी वाटत असेल तर Hounted House मध्ये जाऊन अंगावर 'काटे' कसे उभे रहातात ह्यांचाही अनुभव जरूर घ्यावा.

अशा ह्या अनोख्या व विश्वातील सर्वात मोठया Indoor Theme Park ला साकार करण्यासाठी हातभार लावला तो आपल्यातील एका वास्तुविषारदाने (Architect). विनय (दीपक) गजानन तेलंग ह्यांची वरील Project वर Project Management साठी नियुक्ती झाली होती. Falcon Treehouse हया अमेरीकन कंपनीच्या मूळ Concept वर आधारीत संपूर्ण वास्तूस्थापत्य व निर्माण त्यांच्या निर्देशनाखाली पूर्ण झाले.

विनय तेलंग प्रभादेवीच्या रचना संसदेच्या Academy of Architecture मधून १९८८ साली आर्किटेक्ट झाले. तिथूनच त्यांना दुबईला जाण्याची संधी मिळाली. दुबईतील अनेक महत्वाच्या वास्तु निर्मीतीमध्ये त्यांचा सहभाग आहे. उदाहरणार्थ काही काळ दुबईचे लॅण्डमार्क असलेले Dubai Creek Golf Coarse, Emirates Living व Dubai Silicon Oasis सारख्या मास्टर डेव्हलपमेंटस इत्यादी Project मध्ये त्यांनी आपले प्रावीण्य सिध्द केले.

**पुण्याची कु. अन्विता प्रशांत तेलंग हिला 'गुगल'च्या राष्ट्रीय स्पर्धेत पहिला क्रमांक**

१४ नोव्हेंबर हा 'बालदिन' म्हणून देशभर साजरा केला जातो. त्याच्या औचित्याने २०१६ साली, 'गुगल' ने विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय स्तरावर 'नॅशनल डुडल फॉर गुगल' ही स्पर्धा आयोजित केली होती. ही स्पर्धा तीन गटांत होती. इयत्ता १ ली ते ३ री, ४थी ते ६ वी व ७ वी ते १० वी. या स्पर्धेत तीनही गटांतून तब्बल एक लाखहून अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. यावरुन ही स्पर्धा किती बिकट होती याची कल्पना येते. गुगल डुडलचा विषय होता 'If I could Teach Anyone Anything, It Would Be__.' इयत्ता ४ थी ते ६ वी या गटांत पुणे येथील सौ. अपर्णा व श्री. प्रशांत विजय तेलंग यांची ११ वर्षाची व्हिब्जीयॉर या शाळेत ६ वीत शिकणारी कन्या कु. अन्विता हिच्या चित्राला राष्ट्रीय स्तरावर पहिल्या क्रमांकाचे प्रशस्ती पत्रक मिळाले. तिने रेखाटलेल्या चित्राचे 'Live in the present, enjoy every moment' असे शीर्षक होते. १४ नोव्हेंबरला बालदिनानिमित्त तिचे चित्र 'गुगल इंडिया' च्या होमपेजवर झळकवण्यांत आले होते. अन्विताची आई अपर्णा या स्वत: वेब डिझायनर आहेत व वडील प्रशांत हे सॉफ्टवेअर इंजीनीयर आहेत

**कु. अन्विताचे हार्दिक अभिनंदन**

# वार्षिक स्नेहसंमेलन

सालाबादप्रमाणे, २७ नोव्हेंबर २०१६ रोजी, दादर माटुंगा कल्चरल सेंटर हॉलमध्ये आपल्या ज्ञातिबांधवांचे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. जवळजवळ साडेतीनशे प्रेक्षक आवर्जून उपस्थित होते. डॉ. सौ. मालिनी महेंद्र नाडकर्णी प्रमुख पाहुण्या म्हणून निमंत्रित होत्या. त्यांचा परिचय गेल्या अंकात दिलेलाच आहे. तसेच त्यांचे पती डॉ. महेंद्र गणपत नाडकर्णी देखील निमंत्रित होते. संघाचे अध्यक्ष श्री. मारुती दळवी त्यांच्या अनुपस्थितीत कार्यक्रमाचा कार्यभाग उपाध्यक्ष श्री. शिरीष वाघ ह्यांनी सांभाळला. यंदाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सौ. प्राची देसाई ह्यांनी केले. परंपरेप्रमाणे, व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. मुख्य कार्यक्रमाच्या आधी गतवर्षी निधन पावलेल्या ज्ञातिबांधवांच्या स्मृती प्रीत्यर्थ १ मिनीट स्तब्धता पाळून त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. यानंतर प्रमुख पाहुण्यांना संघाच्या वतीने श्री. शिरीष वाघ ह्यांनी पुष्पगुच्छ व संघाचे स्मृतिचिन्ह दिले. सौ. अर्चना प्रसाद गायतोंडे हिने प्रमुख पाहुण्यांची ओटी भरून स्वागत केले. सोसायटीचे अध्यक्ष श्री. देवदास नाडकर्णी ह्यांनी डॉ. महेंद्र नाडकर्णी यांचे पुष्पगुच्छ व सोसायटीचे स्मृतिचिन्ह देऊन स्वागत केले. संघाचे उपाध्यक्ष श्री. शिरीष वाघ व सोसायटीचे अध्यक्ष श्री. देवदास नाडकर्णी ह्यांनी आपापल्या संस्थांच्या गतवर्षीच्या ठळक घटना व मिळालेल्या देणग्यांचा आढावा घेतला. यानंतर सौ. प्राची देसाई यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करुन दिली.

डॉ. सौ. मालिनी नाडकर्णी ह्यांनी आपल्या कार्याची माहिती प्रेझेन्टेशनद्वारे उत्तम प्रकारे केली. त्यामुळे सर्व श्रोत्यांना रेडिओलॉजीचा उगम, त्यांची उपयुक्तता, वापर ह्यांबद्दल कळले. नळीद्वारे शरीरांतर्गत केलेल्या ऑपरेशनच्या वेळी लागणारी साधने, तसेच त्यांचे अनुभव त्यांनी सांगितले. सर्व उपस्थितांना ह्यामुळे बरीच मोलाची माहिती मिळाली.

आपल्या सर्वांच्या परिचयाचे, कार्यतत्पर व अनुभवी श्री. अरुण भास्कर कसबेकर ह्याना संघातर्फे गेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मानद सदस्यत्व देण्यांत आले होते. त्यांचाही स्नेहसंमेलनांत सत्कार करण्यांत आला. त्यांचा परिचय गेल्या अंकांत दिलेला आहे. श्री. वाघ यांनी त्याचा पुनरुच्चार केला. प्रमुख पाहुण्यांकडून श्री. अरुण कसबेकरांना पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. श्री कसबेकर यांनी त्यांच्या भाषणात, रंजक व खुमासदारपणे त्यांच्या आयुष्याच्या मूल्य तत्वांची ओळख करुन दिली, ज्यांची हसतखेळत त्यांनी जीवनात अंमलबजावणी केली. त्यांच्या मते, आयुष्यात ज्या गोष्टी आपल्या कक्षात असतात, त्या जरूर बदलाव्या पण ज्या गोष्टी हाताबाहेर असतात त्या आनंदाने स्वीकाराव्या. त्यांनी आपल्या तर्फे प्रत्येक कुटुंबाला श्री. शांतादुर्गेच्या अभिषेक मुर्तीचे सुबक चित्र, त्यामागे

रवीन्द्रनाथांची सुरेख कविता अशी भेटवस्तू दिली. ह्यानंतर श्री. राजीव बोरकरनी मुंबई मंचाच्या आगामी कार्यक्रमाची माहिती दिली व श्री. राजेश दिवेकरनी ठाणे मंचाच्या उपक्रमांची माहिती दिली.

मध्यंतरानंतर नेहमीच्या प्रथेप्रमाणे, विवाहाची सुवर्णजयंती गाठणाऱ्या जोडप्यांचा व वयाचा अमृत महोत्सव साजरा करणाऱ्या जेष्ठ नागरिकांनां पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला. ह्याचे निवेदन श्री. राजेश दिवेकर ह्यांनी उत्तम रीतीने केले. ज्ञातीतील गुणवंत विद्यार्थांना एज्युकेशन सोसायटी तर्फे खास स्मृतिचिन्हे व पारितोषिके बहाल केली ते विद्यार्थी म्हणजे ब्रिगेडीयर राजीव गोपाळकृष्ण दिवेकर (निवृत्तीनंतर पीएचडी पदवी), कु. रिया चैतन्य नाडकर्णी (जिल्हा स्तरीय कराटेमध्ये रौप्यपदक), कु. स्तुती सुयश नाडकर्णी व कु. मानसी नितीन नाडकर्णी (बैंकॉक, थायलंड येथील पाचव्या कल्चरल ऑलिंपीयॅड मध्ये कथ्थक नृत्यासाठी मानाचे प्रमाणपत्र). ह्याचे निवेदन श्रीमती प्राची देसाई यांनी केले.

कवळेंमठ संस्कृत पाठांतर स्पर्धेतील विजेत्यांना व गेल्या वर्षी विविध परीक्षांमध्ये विशेष गुण मिळालेल्या ज्ञातीतील हुशार विद्यार्थ्यांना डॉ. महेंद्र नाडकर्णी व डॉ. सौ. मालिनी नाडकर्णी यांच्या हस्ते प्रशस्तिपत्रक आणि बक्षिसे देण्यात आली. ह्याचे निवेदन श्रीमती गीता संझगिरी यांनी केले. सौ. अर्चना प्र. गायतोंडे हिने पारंपरीक नऊवारी साडीत ओटी भरण्याचा कार्यक्रम उत्तम रीतीने पार पाडला व कार्यक्रमाची शोभा वाढवली. कु. ऋतुजा मं. धुमे आणि तन्वी के. दिवेकर यानी कार्यक्रमात स्वयंसेवकांची कामे करून मोलाची मदत केली. श्रीमती मृदुला भांडारकर ह्यांचे कार्यक्रमापूर्वीचे व पडद्या मागचे योगदान अतुल्य आहे. श्रीमती प्राची देसाई ह्यानी आभार प्रदर्शन केले व त्यानंतर सर्व उपस्थितांनी राष्ट्रगीत गाऊन ह्या रम्य सोहळ्याची सांगता केली.

**प्रा. प्राची प्रदीप देसाई, दादर**


**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane,
Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

## ठाणे मंच आयोजित वधूवर परिचय मेळावा

२७ नोव्हेंबर रोजी सकाळी दादर - माटुंगा कल्चरल हॉलमध्ये ठाणे मंच आयोजित वधू-वर परिचय मेळावा भरवण्यात आला.

सर्व प्रथम सर्व कार्यकर्त्यानी दीप-प्रज्वलन करुन अश्या मेळाव्यांना भरभरुन प्रतिसाद मिळण्यासाठी देवाला गाऱ्हाणे घातले.

वधू-वर सूचक मंडळाला वीस वर्षे झाली. अनेक भगिनींचा हे मंडळ यशस्वी होण्यास हातभार लागला. गेल्याच वर्षी दसऱ्याला ह्या मंडळाला On line, Web site चे स्वरुप मिळाले व त्यालाही भरघोस प्रतिसाद मिळाला, या वर्षी 'वधू-वर' मेळावा घेण्यात आला आणि या मेळाव्यालाही अनपेक्षित असा छान प्रतिसाद मिळाला.

ह्या मेळाव्याचे उद्दिष्ट आपल्या बांधवांनी एकत्र येऊन एकमेकांची ओळख करुन घ्यावी हाच होता. पूर्वी आपल्या जी.अेस्. बी (GSB) समाजातील लोक एकमेकांना ओळखत होते पण ते आता जगभर विखुरले गेल्याने ही ओळख पुसट होत गेली आहे. त्यांमुळे सांस्कृतिक कार्यक्रम, सहली व स्नेहसंमेलनाद्वारे सर्वाना पुनर्भेटीचा आनंद मिळतो.

वधू-वर मेळाव्याच्या सुरवातीला श्री. सुरेश पालेकर यांनी ठाणे मंचची थोडक्यात ओळख करुन दिली. मंजिरी कुलकर्णी यांनी सर्व इच्छुक उमेदवारांना आपापली ओळख करुन देण्यास विनंती केली. सर्व मुला-मुलींनी आपली ओळख, छंद व अपेक्षा मनमोकळेपणाने सांगितल्या. काही कारणामुळे ज्यांची मुले येऊ शकली नाहीत त्यांच्या पालकांनी त्यांच्या मुलांची ओळख करुन दिली व अपेक्षा सांगितल्या.

सर्वांनीच या नवीन उपक्रमाची प्रशंसा केली व काही महत्वाच्या सूचनाही केल्या व शुभेच्छा दिल्या. एकंदरीत हा कार्यक्रम घरगुती स्वरुपाचा झाला. सकाळी ९.३० ला सुरु होऊन १२.३० वाजता संपला. कार्यक्रमानंतर पाव-भाजीची सोय करण्यात आली होती.

**मंजिरी मनोज कुलकर्णी, ठाणे**

## विवाह /वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| अमीलिया शिवानंद (नितीन) गायतोंडे, वाळकेश्वर | व | शशांक श्रीवास्तव, भोपाळ |
| शांभवी वसंत नाडकर्णी गोरेगांव | व | विक्रम रंगस्वामी, चेन्नई |
| सचीन शरदचन्द्र नाडकर्णी | व | प्रीती मंगलदास शे. दिवाडकर, अंकोला |
| श्वेता श्रीहर्ष फेणे, शिवाजी पार्क | व | शादाब रिझ्वी, वान्द्रे |
| रूपा प्रकाश पिकळे, धारवाड | व | अजय अनंत देसाई, होन्नावर |
| विनय सुरेश तेलंग, अंकोला | व | संपदा गणपती कामत, कुमटा |

## साठीच्या निमित्ताने
## ।। आरोग्यम् धन संपदा ।।

२९ सप्टेंबर, माझा वाढदिवस, ह्या वर्षी मला ६० वर्षे पूर्ण होणार होती. पण त्याआधी काही तरी वेगळं करुन बघू असा विचार माझ्या मनात आला. तशी बऱ्यापैकी नियमित व्यायाम करणारी मी माझ्या दोन मैत्रिणी सोबत रोज सकाळी पोहायला जाते. आम्ही १४ फेब्रुवारी, २०१६ रोजी ठाणे हाफ मॅरेथॉनमध्ये भाग घ्यायचे ठरवले. त्यासाठी मुलुंड मधल्या कालिदास क्रीडासंकुल मध्ये धावायचा सराव केला. उत्साहात मॅरथॉन पार पडली. मेडल मिरवताना खूप मजा आली. त्यानंतर आम्ही एप्रिल मध्ये भूतानचा दौरा केला. निसर्ग सौंदर्यानी भरलेला हा देश ! सर्वात मजा आली असेल तर तिथल्या Tigernest हया उंच कड्यावर असलेल्या त्यांच्या तीर्थ स्थळाला भेट देताना. चार तासांचा हा ट्रेक. पण हवा छान असल्यामुळे त्रास झाला नाही. ते मंदिर पाहिल्यावर सगळा थकवा पार पळाला.

त्यानंतर मी लगेच मे महिन्यात मुलुंडच्याच 'माउंटन मार्क्स' या संस्थेतर्फे हिमालयातील धन्नाकुन्नु ट्रेक ला गेले. कॉलेज मधल्या मुलामुलींच्या घोळक्यात मी एकटीच वरिष्ठ पण मला वेळोवेळी हात धरुन मुलांनी खूप मदत केली. त्यांच्याबरोबर दोरीवरच्या धाडसी कसरती करताना तसेच मनालीला नदीत राफ्टिंग करताना मला चाळीस वर्षे मागे गेल्यासारखे वाटले.

आणि हो...सप्टेंबर महिन्यात चिंतामणी सोसायटीच्या विहिरीत उडी मारून गणेश विसर्जनपण केले. इतके वर्ष आरोग्य जपण्यासाठी मेहनत घेतल्याचे सार्थक झाले. देवाची कृपा, आईबाबांचा आशीर्वाद व नवऱ्याचे प्रोत्साहन ह्या मुळेच हे शक्य झाले.

**स्मिता उदय वाघ, मुलुंड**
**९८६७६०३५११**


## ठाणे मंचतर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी शिबीर

**तारीख** : फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात
३ दिवस व दोन रात्र

**शुल्क, स्थळ, विषय** : नंतर कळविण्यात येईल.
मर्यादित जागेमुळे प्रथम नोंदणी करणाऱ्यास प्राधान्य.

**संपर्क** : १५ जानेवारी ते ५ फेब्रुवारी

| | | |
|---|---|---|
| **सुरेश पालेकर** | **मंजिरी कुलकर्णी** | **किरण दिवेकर** |
| ९९६९४५५३७० | ९६६५०९८११७ | ९६१९३६२४६० |

## विवाहाचा सुवर्णमहोत्सव गाठणाऱ्या जोडप्यांना वार्षिक स्नेहसंमेलनात स्मृतिचिन्हे देण्यात आली त्यांची नावे


| | | | |
|---|---|---|---|
| सौ. वृंदा | व | श्री. अविनाश प्रभाकर दळवी | – वांद्रे |
| सौ. स्वर्धुनी | व | श्री. सुरेश भवानीशंकर देसाई | – कांदिवली |
| सौ. वृंदा | व | श्री. अरविन्द भालचंद्र दिवेकर | – मुलुंड |
| सौ. हेमा | व | श्री. विश्वेश्वर विठ्ठल दिवेकर | – प्रभादेवी |
| सौ. तारा | व | श्री. शांताराम मंजुनाथ गायतोंडे | – अंधेरी |
| सौ. मुक्ता | व | श्री. हरीश विठ्ठल कुलकर्णी | – पेडर रोड |
| सौ. विजया | व | श्री. महाबळेश्वर (अनंत) दत्तात्रय मुझुमदार | – कुर्ला |
| सौ. अनघा | व | श्री. अनंत शिवराव नाडकर्णी | – पुणे |
| सौ. उषा | व | श्री. निशीकांत लजपत नाडकर्णी | – अंधेरी |
| सौ. सीमा | व | श्री. सुरेश दुर्गप्पा नाडकर्णी | – ठाणे |
| सौ. सरोज | व | श्री. श्रीपाद शंकर नाडकर्णी | – पारले |
| सौ. ज्योत्स्ना | व | श्री. उल्हास वसंत तेलंग | – वांद्रे |
| सौ. पुष्पा | व | श्री. प्रभाकर काशिनाथ तेलंग | – ठाणे |
| सौ. उषा | व | श्री. शरद काशिनाथ वागळे | – चेंबूर |
| सौ. सुहासिनी | व | श्री. अरविंद काशिनाथ वर्टी | – जोगेश्वरी |

## ७५ वर्षे वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींना स्मृतिचिन्हे देण्यात आली त्यांची नावे

| | |
|---|---|
| शीला नागेश बर्डे | माहीम |
| प्रकाश विठ्ठल बोरकर | अंधेरी |
| प्रेमा दिनकर दळवी | दहिसर |
| सविता शशिकांत दळवी | बोरीवली |
| शिवराय(ज्ञानेश्वर)दिगंबर देसाई | गोरेगांव |
| शांताराम मंजुनाथ गायतोंडे | अंधेरी |
| मंगेश शंकर बोरकर | पारले |
| अरविन्द वासुदेव भट | वाळकेश्वर |
| हरीहर नारायण दळवी | ठाणे |
| स्वर्धुनी सुरेश देसाई | कांदिवली |
| उषा वसंत देसाई | प्रभादेवी |
| माधव श्रीनिवास गायतोंडे | बोरीवली |

कुंदा मंजुनाथ कामत जोगेश्वरी
वासुदेव(सुभाष) रघुनाथ कसबेकर अंधरी
विजया महाबळेश्वर मुझुमदार कुर्ला
डॉ. सुहास गोविंद फेणे बंगळूर
दुर्गा वेंकटराव तेलंग जोगेश्वरी
पुष्पा पद्माकर तेलंग वांद्रे
किशोरी अजितकुमार वागळे माहीम
उषा शरद वागळे चेंबूर

शुभदा सदाशिव कुलकर्णी वांद्रे
दिलीप गजानन मुझुमदार ठाणे
माधुरी मधुकर नाडकर्णी दादर
डॉ. रमेश सदाशिव सलगर जोगेश्वरी
मोहन भवानीशंकर तेलंग वाशी
शिवानंद मंजप्पा तेलंग पारले
अनिल विनायक वागळे प्रभादेवी




| Investment Years | Total Investment | Growth Rate 8% | Growth Rate 12% | Growth Rate 15% |
|---|---|---|---|---|
| 15 | 180,000 | 348,000 | 504,000 | 678,000 |
| 20 | 240,000 | 593,000 | 999,000 | 1,516,000 |
| 23 | 276,000 | 794,000 | 1,473,000 | 2,417,000 |
| 25 | 300,000 | 957,000 | 1,898,000 | 3,284,000 |
| 30 | 360,000 | 1,500,000 | 3,530,000 | 7,010,000 |
| 32 | 384,000 | 1,796,000 | 4,308,000 | 9,473,000 |
| 35 | 420,000 | 2,309,000 | 6,495,000 | 14,860,000 |

# प्रतिक्रिया

## ७५ वयोमर्यादा ओलांडल्याबद्दल संघाने केलेल्या सत्कारा निमित्त

गेल्या ज्ञातीच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या प्रसंगी संघाने ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींच्या सत्कारासाठी मलाही निमंत्रित केले याबद्दल मी संघाची शतश: ऋणी आहे.

मी अगदी बालपणापासून प्रति कारवार समजल्या जाणाऱ्या जोगेश्वरी येथील सरस्वती बागेंत राहते. तिथल्या माणसांनी मला भरभरून प्रेम दिले. ही आपुलकी कमीकमी हेत आली आहे का असा विचार मनांत येत असतांनाच संघाचं निमंत्रण आलं. तसं माझं बालपण अगदी आनंदात, मजेत गेलं.

मॅट्रीक उत्तीर्ण झाल्यावर मी आणि बाळमामांची सुहास नाडकर्णी हिने मुली असूनही इस्माईल कॉलेजमध्यें सायन्स विषयात प्रवेश घेण्याचा त्या काळांतला धाडसी निर्णय घेतला. आम्हां दोघांनाही घरुन जबरदस्त पाठिंबा होता. केवळ अभ्यासच नव्हें तर खेळांच्या स्पर्धेतही आम्ही भाग घेत असू व बक्षिसे मिळवत असू. समूहनृत्य, मराठी नाटके हीसुध्दां आमच्या आवडीच्या गोष्टी. कॉलेजमधील केमीस्ट्रीचे प्राध्यापक वि. मा. दी. पटवर्धन (विनोदी साहित्याचे लेखक) यांनी मो. ग. रांगणेकर यांच्या नाटकासाठी आमची निवड केली. दोन अडीच महिने तालमीसाठी आम्हीं गोरेगांवला सरांच्या घरी जात होतो. सरांच्या आम्ही सतत संपर्कात राहिलो. आमचं नातं अतूट झालं. त्यांनी आम्हाला त्यांच्या मानसकन्या म्हणून आपलसं केलं.

ज्युनिअर B. Sc. पर्यंत मी हवेंत तरंगत होते. पण बहिणाबाईंनी म्हटल्याप्रमाणे

अरे संसार संसार जसा तवा चुल्ह्यावर।
आधी हाताला चटका तेव्हां मिळते भाकर।।

असे चटके बसायला सुरुवात झाली. माझ्या मोठ्या बंधूच्या आकस्मित निधनामुळें एक जबरदस्त हादरा बसला. मी उध्वस्त झाले. पण २ हिंदू, १ जैन, १ मुस्लीम, १ इसाई, १ पारसी या माझ्या सहा जीवाभावाच्या मैत्रिणींनी मला आधार दिला. काही वर्षे केमीस्ट म्हणून काम केल्यावर नोकरी सोडली व मुलं थोडी मोठी झाल्यावर B. Ed. केले व जवळच्याच अरविन्द गंडभीर हायस्कूलमध्ये हवी तशी शिक्षिकेची नोकरी मिळाली. तिथेसुध्दा चटका बसला. तिथल्या प्राचार्यांकडून बराच मनस्ताप सहन करावा लागला. पण संस्थेच्या कार्यकारिणीच्या आपल्याच सभासदांनी मला पाठिंबा दिला. पुढे मुलं मोठी झाल्यावर त्यांनी आपल्या वडिलांकडून Perfumery व्यवसाय शिकून आपले क्षेत्र निवडले.

अशा प्रकारे भाकरी हाताला लागतेय असं जाणवतांना संघाचं निमंत्रण आलं आणि भाकरीबरोबर लोणी मिळाल्याचा आनंद झाला. प्रत्यक्ष सभागृहांत आल्यावर मन उचंबळून आलं. पुन्हा पक्कं झालं की कारवारी माणूस अजूनही आमच्यावर माया करणारा आहे. पुन्हा एकदां आपणां सर्वांचे खूप खूप आभार.

**सौ. कुंदा (वागळे) कामत, जोगेश्वरी**
(२८२१३७२३)

## हिन्दू हायस्कूलची कन्याशाळा
## सुमती दामले गर्ल्स हायस्कूल - सुवर्ण महोत्सव

कारवार मधील एकेकाळची अत्यंत प्रसिध्द, अतिशय विद्यार्थी प्रिय व मुख्य म्हणजे शतमान उत्सव साजरा केलेली १८९७ साली कै. वामन मंगेश दुभाषी ह्यांनी सुरु केलेली शाळा म्हणजे पूर्वीचे हिन्दू हायस्कूल. पुढें श्री. मंगेश पुंडलीक कुलकर्णी म्हणजेच नुना मास्तर ह्यांनी ती जोपासली.

१९६६ मध्ये त्यावेळच्या कर्नाटक सरकारच्या धोरणानुसार मुलींसाठी वेगळे विद्यालय असावें असें ठरल्याकारणानें १ जुलै १९६६ पासून त्याच परिसरात, त्याच इमारतीत हिन्दू हायस्कूल फॅार गर्ल्स ह्या नांवाने प्रारंभ झाला. त्या शाळेचे पहिले मुख्याध्यापक म्हणून श्री. श्रीकृष्ण अच्युत सबनीस ह्यांनीं पदभार सांभाळला. ह्या ५० वर्षाच्या कारकीर्दीत पुढे श्रीमती निर्मला वामन वाघ व नंतर श्री. शांताराम (अरुण) सदानंद कुलकर्णी अशा आपल्या ज्ञातीतील तिघांना ह्या शाळेची धुरा सांभाळण्याचा अवकाश प्राप्त झाला.

सुरु होतांना ही शाळा मराठी व कन्नड माध्यमातील विद्यार्थीनींना शिकवीत होती. परंतु कालांतराने कारवारमध्ये मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळा बंद पडल्यानें ह्या शाळेत कन्नड माध्यमाचेच २ वर्ग चालत होते. परंतु आता इंग्रजी शाळांच्या आक्रमणानें ह्या शाळेत ८ वी ते १० वी प्रत्येकी एक नुसार फक्त ३ वर्ग चालत आहेत.

सुरुवातीपासूनच ही शाळा दर्जा सांभाळून होती. शिक्षण, खेळ, व शैक्षणेतर प्रत्येक क्षेत्रात प्रती वर्षी अभिमान वाटावा असे यश व प्रगती ह्या शाळेतील विद्यार्थिनींनी नेहमीच दाखविली. कर्नाटक राज्य शालांत परीक्षेत राज्य स्तरावर क्रमांक घेऊन शाळेच्या विद्यार्थिनींनीं गौरव प्राप्त करुन दिलाय. तसेच खेळात सुध्दा.

नंतर जानेवारी १९७१ साली श्रीमती सुमती दामले (पूर्वाश्रमीच्या सुमती विठ्ठल कुलकर्णी, किन्नर) ह्यांनी आपले नांव शाळेला देण्याच्या अटीवर देणगी दिली त्यामुळे हिंदू हायस्कूल फॉर गर्ल्स हे नांव बदलून श्रीमती सुमती दामले गर्ल्स हायस्कूल असें नामकरण

करण्यात आले. हे वर्ष शाळेने सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून जून पासून जानेवारी २०१७ पर्यंत साजरे करण्याचे ठरविले आहे. १८ सप्टेंबर २०१६ रोजी कर्नाटकातील चित्रपट क्षेत्रातील कवी व साहित्यिक श्री. जयंत गौरीश कायकिणी ह्यांच्या हस्ते दीप प्रज्वलीत करुन महोत्सवाचा प्रारंभ झाला. तालुक्यातील सर्व शाळांसाठी विविध स्पर्धा आयोजित केल्या होत्या. माजी विद्यार्थिनींनी ह्या शाळेविषयी कृतज्ञता बाळगून आपल्या इच्छेनुसार अवश्य देणगी पाठवावी. आनंदाने स्वीकारली जातील.

**शांताराम (अरुण) कुलकर्णी, कारवार**

०८३८२ - २२७०४८ / ०९२४२४११५३५

## अंकोल्याचे ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक श्री आनंद नाडकर्णी यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने

मी सौ. अपर्णा गोरख कसबेकर, पूर्वाश्रमीची कु. दुर्गा (सीमा) आनंद नाडकर्णी. माझे वडील म्हणजे अंकोल्याचे श्री. आनंद मुकुंद नाडकर्णी. त्यांचा २० डिसेंबर २०१६ हा जन्मशताब्दी दिन. त्या निमित्त त्यांच्या समवेत वेचलेल्या काही सुखद व स्मरणीय क्षणांची आठवण काढून त्यांना वंदन करते.

माझ्या वडिलांना, आम्ही नाना म्हणत असू. नानांना दोन भाऊ व तीन बहिणी, आणि नाना सर्वात मोठे म्हणून वडिलकीच्या आदरांने त्यांना धाकटी भावंडे नाना म्हणत. अन् माझ्या आईला वहिनी. आम्ही भावंडे पण त्यामुळे त्यांना बाबा आई न म्हणता नाना वहिनी म्हणायला लागलो. अन् मग तेच रुढ झाले. माझ्या जन्मापर्यंत एकत्र कुटुंबात असणाऱ्या सर्व काका आत्यांचे विवाह झाले होते. फक्त धाकटी सुधा आत्या लाड करायला घरी होती. वहिनी, इतर आत्यांकडून नानांच्या लहानपणाबद्दल बऱ्याच गोष्टी ऐकल्या गेल्या. मी नानांची सर्वांत धाकटी मुलगी म्हणजे शेंडेफळ. लहानपणापासून नानांचे दैनंदिन जीवन अगदी जवळून पाहिलेले आणि शेंडेफळ म्हणून त्यांच्या निवृत्तीनंतरच्या उर्वरित आयुष्याचे अगदी जवळून पाहणे झाले. नाना व वहिनीच्या सहवासात आनंदाने उपभोगलेले क्षण डोळ्यासमारे नेहमीच असतात आज त्यांच्या आठवणीने डोळे भरुन आले आहेत.

आमच्या होन्नेकेरीच्या वाडयावर पहिला मुलगा म्हणून एकत्र कुटुंबात नानांची अतिशय लाडाकोडाने वाढ झाली. अगदी इकडची काडी तिकडे करावी लागली नाही. नानांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अंकोल्यांत झाले. अंकोला हे उत्तर कन्नडा जिल्ह्यातले समुद्रकिनारा व नदी नाल्यावर वसलेले छोटेसे गांव. बाकीच्या कोंकण किनाऱ्यावरील गांवाप्रमाणे अलीकडेच रस्ते डांबरी झाले अन् रस्त्यावर दिवे आले. पण पूर्वी सायंकाळ होताच सर्वत्र चिडीचूप. उन्हाळ्याच्या दिवसांत व पावसांत साप, किरडू, कधी कधी रान मांजरे रात्रीची

फिरताना दिसत. भूतेखेते तर सर्वत्रच असा समज असे.

१९३० ते १९३२ मध्ये नानांनी स्वातंत्र्य चळवळीत सक्रीय भाग घेतला. गांधीजींच्या दांडी यात्रा व मीठाच्या सत्याग्रहाची चळवळ सर्वत्र पसरली होती. मीठावर लावलेल्या कराच्या माफीसाठी अंकोल्यांत पण सभा, यात्रा, सत्याग्रह झाले. नानांना त्यामुळे अटक होऊन कारावास भोगावा लागला. त्यांना नासिकाच्या कारागृहांत ठेवण्यात आले होते. तोपर्यंतच्या आयुष्यांत त्यांना कधी पाण्याचा पेला देखील उचलावा लागला नव्हता. पण कारावासाची शिस्त त्यांनी पाळली. त्यातून स्वावलंबन शिकले. स्वत:ची सर्व कामे करुन पुन्हा दुसऱ्याला मदत करायची शिस्त त्यांना लागली. जात्यावर पीठ दळणे, भाकरी करणे, रोज नेमाने योगासने घालणे. अगदी शेवटी तबला व पेटी देखील सुरेख वाजवायला शिकले. कारावासातून बाहेर आलेल्या नानांनी अगदी शेवटपर्यंत स्वावलंबन व योगासने करणे नियमाने पाळले. आम्हां मुलांनापण लहानपणांतच स्वावलंबनाचे धडे दिले व गिरवायला लावले.

आम्ही पांच भावंडे. मला दोन बहिणी अन दोन भाऊ. एकएक करत सर्व अंकोल्यांतून बाहेर पडले अन् सर्वत्र विखुरले. मग फक्त सुट्टी आणि सणासुदीला अंकोल्यात जाणे होई पण घरी एकदा आलो की नानांच्या कामसूपणाचे कौतूक वाटे. घरी एक काळी गाय होती. तिची निगराणी आम्ही भावंडे नानांसमवेत करत असू. गाय मृत्यू पावल्यावर आम्ही तिला बागेत पुरले अन आजही ती पुरलेली जागा मला देऊळासमान वाटते. तिथे जाताच माझे डोळे भरुन येतात अन हात जुळले जातात.


नाना पिपल्स मल्टीपरपज हायस्कूलमध्ये शिक्षक होते. तिथे नाना एकटेच हिन्दी विषारद शिक्षक होते आणि खास अनुभव घेतलेले PT निपुण शिक्षक होते. ते रोज शाळेत सायकलवरुन जायचे. स्वत:च सायकल दुरुस्त करायचे. नोकरी व्यतिरिक्त वेळ ते बागकाम, समाजसेवा अन् आर्यादुर्गा देवीची सेवा करण्यांत घालवायचे. नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण एज्युकेशन सोसायटीतर्फे गरीब होतकरु विद्यार्थ्यांना, कुटुंबाना मिळणाऱ्या मदतीसाठी गरजू लोकांचे अर्ज ते भरुन द्यायचे, त्यांना मार्गदर्शन करायचे व मदत मिळवून देण्यात साहाय्य करायचे.

आर्यादुर्गा देवीचे देऊळ आमच्या होन्नेकेरीतल्या घरापासून दूर होते. सायंकाळी रात्री अपरात्री रस्त्यावर दिवे नव्हते. मातीचे कच्चे रस्ते पण हाती कंदील घेऊन ते देवळांत रोज जात. कधी कधी घरी परतायला रात्र व्हायची पण रात्रीची आरती करुनच ते घरी यायचे. मी मात्र वहिनीसमवेत बाहेरचा मिट्ट काळोख बघत घाबरुन नानांची वाट पहात रहायचे. एकदा तर देवीच्या दागिन्यांची चोरी झाल्याचे कळताच रातोरात ते देवळांत गेले. देवीची चोरी करणारा चोर पकडेपर्यंत त्यांना थारा नव्हता. नानांना कधी त्रास झाला नाही. देवीच त्यांना ध्यैर्य व बळ देत असावी. वयाच्या ऐंशी वर्षापर्यंत त्यांनी देवीची सेवा मनोभावे आनंदाने केली. नंतर मात्र


प्रकृती स्वास्थासाठी त्यांना मुंबईला यावे लागले. पण नानांनी सर्व आनंदाने स्वीकारले. देवीची प्रार्थना, भजने म्हणत त्यांचा शेवट सर्व मुलांच्या सहवासात मुंबईत माझ्या घरीच झाला.

अशा ह्या शिस्तप्रिय, प्रेमळ, सज्जन शिक्षकाचा १५ ऑगस्ट १९७२ रोजी भारतीय स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते स्वातंत्र्यसैनिक म्हणून गौरव करण्यात आला. त्यांना ताम्रपट प्रदान करण्यात आला. भारतीय स्वातंत्र्य सैनिकाची कन्या म्हणून मला नानांचा अन् त्यांना शांतपणे साथ देणाऱ्या वहिनींचा खूप अभिमान वाटतो.

**सौ. सीमा (अपर्णा) गोरख कसबेकर, वाशी**
९९२०३३६१९४



## मत्सगंधा



**भाद्रपद आला संपला श्रावण**
**खावक होया आता 'मासळी'चा कालवण**
**'कोंबडी'ची सागोती भाजणीचे वडे**
**करुक व्हयेत आता घराकडे**
**'कोलंबी'चे आणि 'बोंबला'चे भुजणे**
**दोन नारळ त्यासाठी खवणे**
**'मांदेली' 'तारली'ची करुक होई आमटी**
**लाल तिखट तिर्फळा व्हई एक नारळ वाटी**
**'सुरमई'च्या कालवणात लाल तिखट लसुण**
**खोबऱ्याचो रस टाकुया एक नारळ किसुन**
**भरल्या 'कुर्ल्या' 'हलव्या'ची कळपुटी**
**एकदा खाल्ला तर रिचवाल वाटी, वाटी**
**'मुडदुशाची' आमटी त्यात चिंचेचा कोळ**
**भरलेला 'पापलेट' आणि मासो व्हयो 'घोळ'**
**सोलातलो 'बांगडो' आणि 'मोरी'चा मटाण**
**सरंग्याची करी आणि 'बोंबला'चा हुमाण**
**'बांगड्या' हुगी आणि 'कालव्या'चा तीखट**
**'कोलंबी'ची भरली वांगी 'करलि'चे सार आंबट**
**'कोलंबी'चे धबधबे आणि 'कोलंबी'चो पुलाव**
**चला तुमच्या घराकडे आम्हि जेवुक इलाव**

**मत्सगोत्री**

# ब्रह्मविद्या : आरोग्य आणि यशाची गुरुकिल्ली

आजचे युग हे स्पर्धेचे व संगणकाचे आहे. जीवघेण्या स्पर्धेमुळे मानसिक संतुलन बिघडते व संगणकापुढे सतत लक्ष केंद्रीत करण्याच्या गरजेमुळे शारीरिक व्याधी निर्माण होतात. त्याला पूरक घटक म्हणजे गर्दीच्या प्रवासाची उबग येणारी दगदग. त्याचाच परिपाक म्हणजे रक्तदाब, मधुमेह, मणक्याचे विकार, अल्सर, आम्लपित्त अशा प्रकारच्या व्याधी तरुणपणातच उद्‌भवतात. त्याच्यावर मात करण्याचा एक उपाय म्हणजे ब्रह्मविद्येचे आचरण.

**ब्रह्मविद्या म्हणजे काय ? :** अध्यात्मिक श्वसन पध्दती व ध्यानाच्या सोप्या पध्दती यांचा नियमित सराव करण्याचे ज्ञान. आपण स्मार्टफोनसारखे अनेक सुविधा उपलब्ध असलेले उपकरण वापरले तर त्यांतील क्षमतेचा फार तर २० ते २५ टक्केच उपयोग करतो. त्याचप्रमाणे आपण श्वासोश्वास करतो तेव्हा खरे तर आपण फुप्फुसाची फार कमी क्षमता उपयोगात आणतो. ब्रह्मविद्या असे एक शास्त्र आहे की त्यातील तंत्रामुळे फुप्फुसाच्या क्षमतेचा जास्तीत जास्त लाभ घेता येतो व आपले आरोग्य नेहमी सुदृढ स्थितीत राहते.

**आरोग्य, यश आणि ब्रह्मविद्या :** आरोग्य हे शरीराशी संबंधित आहे तर यश हे नाना क्षेत्रांशी संबंधित आहे. ब्रह्मविद्येमुळे ही दोन्हीही प्राप्त करण्यास साहाय्य होते. ज्याप्रमाणे आधुनिक विज्ञान आपल्याला भौतिक विश्वाच्या नियमांबद्दल माहिती देते व आपले ज्ञान प्रगल्भ करते त्याप्रमाणे ब्रह्मविद्येच्या आचरणाने आपल्या जीवनाला डोळस दृष्टी प्राप्त होते. जेव्हा आपण या नियमांचे जीवनांत पालन करतो तेव्हा वंगण लावलेल्या मशीनप्रमाणे आपले तन व मन व्यवस्थित राहण्यांत मदत होते.

**दैनंदिन जीवनांत ब्रह्मविद्येचा उपयोग :** आपल्या समोर आलेल्या सर्व अडचणी व समस्या दूर करण्याची शक्ती प्रत्येक मानवात असते. पण त्या शक्तीचा कसा उपयोग करावा हे आपल्याला अवगत नसते. ब्रह्मविद्या त्या शक्तीचा कसा उपयोग करावा याची निश्चित पध्दती शिकविते. या पध्दतीच्या नियमित सरावाने मनुष्य त्याच्या विविध शरीरिक व मानसिक समस्यांतून मुक्त होऊन आनंदी जीवन जगू शकतो.

**ब्रह्मविद्येच्या शिक्षणाची पध्दत :** ब्रह्मविद्येच्या पध्दतीमध्ये श्वसन आणि विचार यावर भर दिला जातो. कारण या दोन्ही गोष्टी मानवी जीवनाचे मूलभूत घटक आहेत. श्वास आणि विचार आपण जन्मल्यापासून वापरत असलो तरी त्या योग्यप्रमाणे कशा वापराव्या हे आपण शिकलेलो नसतो. कुठल्याही शाळेत वा कॉलेजमध्ये हे शिकविले जात नाही. आश्चर्य वाटण्याची गोष्ट म्हणजे सर्वसाधारणपणे माणूस आपल्या फुप्फुसाच्या केवळ १० टक्के क्षमतेचाच वापर करतो. ब्रह्मविद्येमध्ये आध्यात्मिक श्वसनप्रकाराच्या सरावाने श्वसनप्रक्रिया सुधारते. अशा पध्दतीने श्वसन व ध्यान यांमुळे मन शांत झाल्याने सराव करणारा साधक अधिक उत्तम

शारीरिक व मानसिक आरोग्य उपभोगतो.

**ब्रह्मविद्येच्या सरावाने बऱ्या होणाऱ्या व्याधी :** ब्रह्मविद्या हे काही एखादे औषध नाही. औषध म्हटले की ते कुठल्यातरी विशिष्ट आजारासाठी असते. ब्रह्मविद्या तशी नाही.पण तिच्या सरावाने सर्व व्याधींचे संपूर्ण उच्चाटन होण्यास मदत होते. अस्थमा, रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, मानदुखी, पाठदुखी, जुनाट व सतत असणारी सर्दी, निद्रानाश वा तत्सम विकार ब्रह्मविद्येच्या साधनेने नियंत्रणांत येऊ शकते.

**साधनेसाठी लागणारा वेळ :** आध्यात्मिक श्वसनप्रकाराच्या सरावासाठी सकाळी २० मिनिटे व ध्यानाच्या सरावासाठी रात्री किंवा पहाटे २० मिनिटे एवढाच वेळ पुरेसा आहे.

**हे शिक्षण देणारी केंद्रे :** 'ब्रह्मविद्या साधक संघ' ही एक सेवाभावी संस्था आहे. संस्थेतर्फे अभ्यासक्रमाचे वर्ग मुंबई, ठाणे, डोंबिवली, पुणे, रत्नागिरी व इतर अनेक ठिकाणी नियमितपणे घेतली जातात. त्याचे चार प्रकार आहेत.

१) आठवडयांतून एकदा चालणारा वर्ग अंदाजे दीड तासाचा, एकूण २२ आठवडे.

२) ५ दिवसाचे निवासी शिबीर.

३) पत्रद्वारा अभ्यासक्रम : ज्यांना वरील दोन्ही अभ्यासक्रम करणे शक्य नसेल त्यांना पत्राद्वारे हा अभ्यास करण्याची सोय आहे. या प्रकारांत साधकाला अभ्यासाचा एक पाठ दर आठवडयाला एक याप्रमाणे पाठविले जातात.

४) स्काय्प द्वारे ही शिकविण्याची सोय आहे.

**(सदर मजकूर 'ब्रह्मविद्या साधक संघ यांच्या पत्रकाच्या आधारे)**

**(विशेष माहितीसाठी संपर्क : ब्रह्मविद्या साधक**
**श्री अरुण कंटक, पारले २६१४००२७)**

**ब्रह्मविद्या साधक चॅरिटेबल ट्रस्टचा**

**ब्रह्मविद्या साधक संघ**

**कार्यालय :** लक्ष्मी केशव बिल्डींग, दुसरा मजला, बँक ऑफ महाराष्ट्रच्यासमोर, गोखले रोड, नौपाडा, ठाणे (पश्चिम) ४००६०२

दूरध्वनी : २५३४७७८८ / २५३३९९७७

Visit : www.brahmavidya.net

/BrahmavidyaSadhakSangh /BrahmavidyaSS

/BrahmavidyaSadhakSangh

**Best Compliments from**

# GANESHA YOGA & WELLNESS

Exploring Beyond Body and Mind®

**करावे मनाची धारणा, नित्य योग आणि साधना।**

आई आणि पप्पानी दिलेला आध्यात्मिक वारसा अमूल्य आणि अमाप आहे.
त्यामुळेच आज आम्ही योग साधनेतून समाजसेवा करु शकत आहोत.

Conducting Ashtanga Yoga Sessions since 2009

गिरीश महाबळेश्वर शानभाग (RYT) पद्मजा गिरीश शानभाग (RYT)

Email-girishaum@gmail.com www.ganeshyoga.weebly.com

5563 Brenchley Ave., Mississauga, ON, CANADA

# श्रीमती प्रेमा सबनीस यांचे देहावसान
# कारवारचे एक नेतृत्व हरपले

७ नोव्हेंबर रोजी श्रीमती उषा (प्रेमा) सबनीस यांचे त्यांची कन्या श्रीमती प्रभा पंडित यांच्या निवासस्थानी मुंबईत बोरीवली येथे निधन झाले. ही बातमी कारवारमध्ये धडकली तेव्हा तेथील सुशिक्षित बांधवांना, विशेषत: भगिनींना, फार खेद झाला. निधनप्रसंगी त्यांचे वय ९५ वर्षे एवढे होते. प्रेमाताईंनी मुंबईत प्रयाण करुन सुमारे १५ वर्षे झाली परंतु मध्यवर्ती कारवार व मारुती देवस्थानाच्या परिसरांतील नागरीक अद्यापही त्यांना विसरलेले नाहीत.

कारवार सोडून मुंबईत कायमचे जायचे जेव्हां त्यांनी निश्चित केले तेव्हां त्यांनी सर्वप्रथम काय केले तर त्यांच्या सबनीस वाडयाच्या प्राकारांत असलेल्या सबनीस चाळींत पिढ्यान् पिढ्या वास्तव्याला असलेल्या सर्व भाडेकरुंना त्यांच्या कुवतीप्रमाणे अल्प किंमतीत त्यांची घरे त्यांच्या नांवे करुन दिली. आज त्या घरांचे मालक झालेले ते सर्व भाडेकरु प्रेमाताईंचे कायमचे ऋणी आहेत. त्या चाळीतील सर्वांशी त्यांचे मालक-भाडेकरु असे बाजारी संबंध नव्हते तर त्यांचे सर्वांशी अत्यंत स्नेहाचे, आपुलकीचे, खेळीमेळीचे कौटुंबीक प्रकारचे जिव्हाळ्याचे नाते होते.

प्रेमाताई या मूळच्या अंकोला येथील एक ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक शिवराव तेलंग, जे तेथे 'आंबाड शिवा' या नावाने सुपरिचीत होते, यांची कन्या. त्यांचा विवाह हिन्दू हायस्कूलमधील श्रीकृष्ण अच्युत सबनीस ऊर्फ सबनीसमास्तर यांच्याशी झाला. त्या वाडीकर कुटुंबाशी एवढया एकरूप झाल्या की त्या कुटुंबात बोलणारी वाडीची भाषा त्यांनी अस्खलीतपणे आत्मसात केली होती. सबनीस मास्तर अगदी शांत व सौम्य स्वभावाचे. तर प्रेमाताई हिरीरीने वागणाऱ्या. सबनीसमास्तर यांनी आपल्या तडफदार पत्नीच्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक कार्यात विरोध केला नाहीच उलट प्रोत्साहनच दिले.


कारवार येथील अनेक सार्वजनीक कार्यात त्यांचा सक्रीय सहभाग असे. १९५२ साली सुरु झालेल्या महाराष्ट्र एकीकरण समितीच्या चळवळीत त्या नेहमीच अग्रेसर असत. कालांतराने समितीचे अनेक कार्यकर्ते काँग्रेस (इंदिरा) पक्षांत सामील झाले त्यांत त्या पण होत्या. स्वार्थासाठी पक्षबदलू न होता शेवटपर्यंत त्या पक्षाशी एकनिष्ठ राहिल्या. १९७४ च्या सुमारास जिल्हावार स्थापन झालेल्या Karwar Land Tribunal मध्ये सभासद म्हणून त्यांची मानाची नेमणूक झाली. आपल्या पदाचा उपयोग त्यांनी कित्येक पीडितांच्या प्रलंबित असलेल्या प्रकरणांत संबंधितांना तुरंत न्याय मिळवून देण्यात केला. कारवार महिला मंडळाच्या त्या पदाधिकारी होत्या. मंडळाच्या प्रत्येक कार्यक्रमांत त्यांचा पुढाकार आणि सहकार असायचा, अगदी सरस्वती पूजेच्या वेळच्या करमणुकीच्या कार्यक्रमांत सुध्दा.

**कारवारकरांतर्फे प्रेमाताईंना ही भावपूर्ण श्रध्दांजली,**

**शांताराम (अरूण) स. कुलकर्णी, कारवार**
०८३८२-२२७०४८

www.kccgoa.in

कोमल हिरवी तृणपाती ही
अलगद झुलवी सर्वांग,
कोवळ्या सुवर्ण प्रकाशात
उजळून जाई आनंद



अप्रतिम निसर्गाने नटलेलं **सुखसमृद्धी**

**मंगेशाच्या देवळापासून २ मिनिटांच्या अंतरावर,**
**मंगेशी, फोंडा- गोवा**

**प्रॉजेक्ट मान्यता:** गोवा टाउन प्लॅनिंग
**कर्जसहाय्य:** नामवंत वित्त संस्था



मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मनःशांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.

**फ्लॅटस् उपलब्ध: १ रुम किचन, १ बी.एच्.के, २ बी.एच्.के**

a Project by:
**कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी**

**मुंबई ऑफिस:** श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला, सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलि:**2683 3841/47/ 72.** मोबा: **98336 36451**
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in

गोवा ऑफिस: टी- १, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321

गोवा साईट: 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

saadadvertising.com

## निधन

| | | |
|---|---|---|
| मीरा चंद्रकांत देशप्रभू | (गांवगेरी) | माहीम |
| (पूर्वाश्रमीच्या मीरा दत्तात्रय वागळे) | | |
| गिरीजा शिवानंद कसबेकर | (कडवाड) | बंगळूर |
| गोविंद रंगराव कुलकर्णी | (खारगे) | जोगेश्वरी |
| शांताराम (बाळा) सदाशिव कुलकर्णी | (भैरे) | कणसगिरी |
| सतीश शामराव मुझुमदार | (अंकोला) | पुणे |
| अनसूया नरसिंह मुझुमदार | (अंकोला) | जोगेश्वरी |
| सुंदरी महारुद्र नाडकर्णी | (अगळी) | अंधेरी |
| अरुण दत्तात्रय नाडकर्णी | (अंकोला) | मीरा रोड |
| मनोहर शंकर नाडकर्णी | (सांवरपै) | माहीम |
| यशवंत विश्वनाथ नाडकर्णी | (अंकोला) | ताडदेव |
| सुलोचना गोपाळकृष्ण पालेकर | (मुंडगोड) | चेम्बूर |
| काशिनाथ विष्णू पावशे | (बाड) | दादर |
| नीता अश्विन पोटा | | |
| (पूर्वाश्रमीच्या सुधा काशिनाथ वागळे) | (माजाळी) | चारकोप |
| श्रीकांत शामराव सुखटणकर | (हारवाडे) | अमेरिका |
| उषा (प्रेमा) श्रीकृष्ण सबनीस | (कारवार) | बोरीवली |
| महाबळेश्वर दामोदर शानभाग | (शिराळी) | अंधेरी |
| भालचंद्र रामराव वागळे | (हाणकोण) | इंग्लंड |


# YOGESH D. WAGLE
### YOUR ONE STOP SHOP FOR

• HEALTH INSURANCE • GENERAL INSURANCE • LIFE INSURANCE

• PERSONAL LOAN • CAR LOAN • HOUSING LOAN

• BUSINESS LOAN • MORTGAGE LOAN

**WE OPERATE PAN - INDIA**
**Mob. : 9901521411**
Email : yogeshwagle.karwar@gmail.com, yogeshwagle1975@rediffmail.com,

## संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

**(मागील अंकानंतर)**

**उल्लेखनीय देणग्या**

### श्री विनय (मोरेश्वर) नाडकर्णी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ समाजसेवानिधीसाठी एक लाख रुपयांची देणगी

आपल्या ज्ञातीचे एक निस्सीम हितचिंतक श्री. विनय (मोरेश्वर) नागेश नाडकर्णी यांचे अलीकडेच निधन झाले. आपल्या संघाला ते सातत्याने विविध प्रसंगी भरघोस देणग्या देत असत व तेसुध्दां निनावी. जवळजवळ तीन दशके ते सान फ्रान्सिस्को येथे होते. तीन वर्षापूर्वी ते पुणे येथे स्थायिक झाले होते. मुखपत्रिकेंत ज्यांचे ज्यांचे लेख प्रसिध्द होत असत त्यांच्याशी ते पुण्याहुनच नव्हे तर अमेरिकेंतूनसुध्दा संपर्क साधत असत व त्यांच्याशी ओळख करुन घेऊन त्यांच्या लेखांचे तोंड भरुन प्रशंसा करीत असत. या त्यांच्या वृत्तीमुळे लेखकांनाही स्फूर्ती मिळे. दुसऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणे व त्यांच्या चेहऱ्यावर स्मित आणणे ही त्यांची इच्छा.

अशा या सहृदय व अजातशत्रू व्यक्तीच्या स्मरणार्थ त्यांच्या कुटुंबीयांनी समाज सेवा निधीसाठी एक लाख रुपयांची भेट दिली आहे.

### अंकोला येथील एक ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व लोकप्रिय शिक्षक श्री. आनंद नाडकर्णी यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी संघाला पन्नास हजार रुपयांची देगणी

अंकोला येथील कारावास भोगलेले एक ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक व लोकप्रिय शिक्षक श्री. आनंद मुकुंद नाडकर्णी यांचा २० डिसेंबर २०१६ हा जन्मशताब्दीवर्षदिन. त्याप्रसंगी त्यांचे स्मरण म्हणून त्यांच्या मुलामुलींनी संघाला पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे. त्यांच्या कार्याची ओळख करुन देणारा एक लेख याच अंकात अन्यत्र प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

### श्रीमती सुमन वागळे यांजकडून यंदाही संघाला पन्नास हजार रुपयांची देणगी

पुणे येथील श्री रुद्रा रामचंद्र वागळे यांचे सात वर्षापूर्वी निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती सुमन वागळे प्रतिवर्षी पुण्यतिथीच्या प्रसंगी संघाला पन्नास हजार रुपयांची देणगी देतात. यंदाही त्यांनी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

### श्री. वासुदेव कुलकर्णी यांच्या इच्छेनुसार वृध्दसेवानिधीसाठी आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी

माहीम येथे राहणारे श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी आपल्या ज्ञातीसंबंधित घटनांमध्ये विशेष रस घेत असत. त्यांनी संघाला दोन वेळा एकेक लाख रुपयांच्या देणग्या दिल्या होत्या. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्या हितचिंतकांनी त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ पन्नास हजार रुपयांची देणगी दिली होती. दोन वर्षापूर्वी आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली.अलीकडेच त्यांनी त्यात आणखी पन्नास हजार रुपयांची भर घातली आहे.

## श्री रघुवीर रामाणी यांच्या स्मरणार्थ वैद्यकीय साहाय्यासाठी पन्नास हजार रुपयांची देणगी

फ्रेंच ब्रीज येथे राहणारे श्री. रामकृष्ण रघुवीर रामाणी यांच्या जन्मशताब्दी प्रसंगी त्यांचे सुपुत्र सर्वश्री अरुण व संतोष रामाणी यांनी २००८ साली आपल्या एज्युकेशन सोसायटीला तीस हजार रुपयांची देणगी दिली होती. अलीकडेच त्यांनी आपले आजोबा श्री. रघुवीर रामकृष्ण रामाणी यांच्या स्मरणार्थ वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

## डॉ. सरोजिनी व श्री. गणपती गायतोंडे यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी

वाळकेश्वर येथे राहणारे श्री. गणपती घनश्याम गायतोंडे यांचे २०१३ साली निधन झाले तेव्हां त्यांचे सुपुत्र डॉ. सतीश यांनी आपल्या एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांची देणगी दिली होती. त्याचा मागे मुखपत्रिकेत उल्लेख आलेलाच आहे. डॉक्टरांची आई डॉ. सरोजिनी यांचे सप्टेंबरमध्ये निधन झाले. डॉ. सतीश व त्यांच्या पत्नी श्रीमती प्रज्ञा यांनी आई वडिलांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

## सौ कुंदा वागळे कामत यांजकडून वृध्द सेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी

जोगेश्वरी येथील अरविन्द गंडभीर हायस्कूलच्या लोकप्रिय शिक्षिका सौ. कुंदा मंजनाथ कामत (सरस्वती बागेतील आनंद जोगप्पा वागळे यांची कन्या) यांचा २७ नोव्हेंबर रोजी ज्ञातीच्या स्नेह संमेलनांत त्यांनी ७५ वर्षे ओलांडल्याबद्दल संघातर्फे सन्मान करण्यात आला होता. त्याप्रसंगी त्यांनी आपले आईवडील, सासूसासरे व भाऊबहिणी यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ वृध्दसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली. देणगीसोबत त्यांनी ज्ञातीबद्दल असलेल्या भावना व्यक्त करण्यासाठी एक पत्र लिहिले ते याच अंकात अन्यत्र प्रसिध्द केले आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्वजांच्या स्मरणार्थ अनामिकेकडून. | २,५०० |
| २. | श्री. के. वाय. नाडकर्णी ट्रस्टकडून २०१६-१७ करिता. | २,९०० |
| ३. | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २० व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून. | १,००१ |
| ४. | श्री. विनय (मोरेश्वर) नागेश नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ भाची डॉ. मनीषा सतेज सबनीस यांजकडून. | १०,००० |
| ५. | श्री. आनंद मुकुंद नाडकर्णी यांच्या १०० व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांची मुले प्रसाद (मुकुंद) व किशोर व मुली आशा, प्रभा व सीमा यांजकडून. | ५०,००० |

६. श्रीमती यमुनाताई, सपाताई व सिंधूताई या बहिणींच्या स्मरणार्थ भाऊबीजेनिमित्त श्री. मंगेश शंकर बोरकर यांजकडून. ३,००३
७. श्री. व्ही. टी. यार्दी ट्रस्टकडून. १,५६२
८. श्री. के. व्ही. राव यांच्या स्मरणार्थ बहीण श्रीमती राजश्री रमेश वागळे यांजकडून. १,००१
९. श्रीमती सिंधु सच्चिदानंद नाडकर्णी यांच्या ५ व्या पुण्यतिथीनिमित्त नाती सुदिप्ता व अनुष्का सुबोध नाडकर्णी यांजकडून ५,०००
१०. श्री. विनय (मोरेश्वर) नागेश नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ कुटुंबीयांकडून संघाला भेट. १,००,०००
११. श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुधा यांजकडून १,००१
१२. श्री. रुद्रा रामचंद्र वागळे यांच्या सातव्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती सुमन यांजकडून. ५०,०००
१३. ७५ व्या वाढदिवसाच्या प्रसंगी संघास शुभेच्छापूर्वक भेट
श्री. मंगेश शंकर बोरकर १०,०००
श्री. प्रकाश विठ्ठल बोरकर १०,०००
१४. मुखपत्रिकेचे लोकप्रिय संपादक श्री. द. ना. नाडकर्णी यांच्या ८० व्या वाढदिवसाच्या प्रसंगी (७.१.२०१७) श्रीमती मृदुला भांडारकर यांजकडून. सदिच्छा पूर्वक. १,०८०

## वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ

१. श्री. रघुवीर रामकृष्ण रामाणी त्यांच्या स्मरणार्थ नातू सर्वश्री अरुण व संतोष रामकृष्ण रामाणी यांजकडून. ५०,०००
२. श्रीमती प्रमिला व श्री शामराव मंगेश पिंगे यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. मंगेश यांजकडून. ३,०००

## वृध्दसेवानिधीसाठी

१. श्री. रामदास काशिनाथ नाडकर्णी यांच्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती सिंधु यांजकडून. १,५०१
२. श्रीमती विमल (वत्सला) व श्री भालचंद्र अण्णाजी वागळे यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती स्वाती व पुत्र श्री. राजन यांजकडून. ५,०००
३. श्रीमती इंदू व श्री. सच्चिदानंद अनंत वर्टी यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून ३,०००
४. श्रीमती इंदिरा रामचंद्र कामत (श्रीमती विठाबाई कसबेकर) यांच्या १ ल्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती (नीता) शिल्पा व जामात श्री. सुधीर मनोहर वर्दे यांजकडून. २,५००

| | | |
|---|---|---|
| ५. | श्रीमती मीरा व गोपाल सर्वोत्तम तेलंग यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र सर्वश्री मिलींद व निमीष यांजकडून. | ५,००१ |
| ६. | श्री. गजानन सीताराम बोरकर यांच्या ५ व्या पुण्यतिथी निमित्त पत्नी श्रीमती विमल यांजकडून. | १०,००० |
| ७. | श्री. वासुदेव नारायण कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ हितचिंतकाकडून | ५०,००० |
| ८. | आई वडील श्रीमती अनसूया व श्री. आनंदराव जोगप्पा वागळे, भाऊ मोहन व शरद, बहिणी, इंदू, गंगा व पुष्पा व सासूसासरे. श्रीमती शांता व सीता व श्री. कृष्ण मंजनाथ कामत यांच्या स्मरणार्थ श्रीमती कुंदा मंजनाथ कामत यांजकडून. | ५०,००० |
| ९. | कु श्रेया कुणाल वागळे हिजकडून. | ५,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती विमल (वत्सला) व श्री भालचंद्र अण्णाजी वागळे यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. राजन व स्नुषा श्रीमती स्वाती यांजकडून. | ५,००० |
| २. | पूर्वजांच्या स्मरणार्थ भांडारकर कुंटुबीयांकडून पितृपक्षानिमित्त | १,५०१ |
| ३. | श्री. के. वाय. नाडकर्णी ट्रस्टकडून २०१६-१७ करिता. | २,९०० |
| ४. | डॉ. सरोजिनी व श्री. गणपती घनश्याम गायतोंडे यांच्या स्मरणार्थ पुत्र डॉ. सतीश व स्नुषा श्रीमती प्रज्ञा यांजकडून (रु. २५,००० प्रत्येकी) | ५०,००० |
| ५. | श्री. रमाकांत भवानीराव बोरकर यांच्या २० व्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या मुलांकडून. | १,००१ |
| ६. | श्री. व्ही. टी. यार्दी ट्रस्ट कडून | १,४३८ |
| ७. | श्री. घनश्याम गोपाल वर्टी यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सुधा यांजकडून | १,००१ |

## ठाणे मंच देणगीदारांची यादी

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. रश्मी शिवानंद कामत, जोगेश्वरी | २,५०० |
| २. | विजय घनश्याम कामत, ठाणे | १,००१ |

## विजूले चुटकुले


**बायल घोवाक :** ***तुमगेलो दोस्त ज्या चलेबरोबर लग्न करचो आसा ती चली बरी ना. ताका सांगा त्या चले बरोबर लग्न करनाका.***

**घोव :** ***हांव सांगचो ना. माका सांगच्याक कोण आईल्ले?***

**विजय सदानंद वागळे, ठाणे**
**(९२२१६०७५७७)**

Regd. with registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80

NKGSB Bank
NKGSB Co-op. Bank Ltd.




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.